पुण्य नगरी

# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसीच्या ११ विद्यार्थ्यांची निवड



**जयसिंगपूर :** डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूरच्या अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी प्लेसमेंट क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. टेककेअर मेडिकल सर्व्हिसेस प्रा. लि. या अमेरिकेतील हेल्थकेअर कंपनी, पुणे आणि मुंबई येथील शाखांमध्ये मेडिकल रेकॉर्ड एक्झिक्युटिव्ह या पदासाठी त्यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना वार्षिक ३ लाख रुपयांचे पॅकेज देण्यात येणार आहे.

यामध्ये आरती लोहार, आकांक्षा आठवले, अंजनादेवी वैष्णव, अनुष्का कागले, अपूर्वा चौगुले, भाग्यश्री पाटील, मैथिली उपाध्ये, निकिता पोवार, प्राजक्ता जाधव, ऋतिक पुजारी आणि संस्कृती देसाई या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. निवडीबाबत प्राचार्य डॉ. शीतलकुमार एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांना प्लेसमेंट ऑफिसर विनोद पाटील, उपप्राचार्य डॉ. सतीश किलजे, प्रा. सौरभ समडोळे यांचे मार्गदर्शन केले. डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विजय मगदूम व उपाध्यक्षा अॅड. डॉ. सोनाली मगदूम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.